## पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,ब क्षेत्रीय कार्यालय,

### कार्यपत्रिका क्रमांक १

(सभापती निवडीची सभा)

**– सभावृत्तांत --**

दिनांक : ०६/०२/२०१४ वेळ : सकाळी १२.०० वा

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीच्या सभापती निवडीची विशेष सभा गुरुवार, दिनांक ०६/०२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. यशवंतराव चव्हाण सभागृह (मा.महापालिका सभागृह) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८. येथे मा.श्री.गणेश पाटील, पिठासन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
२. मा.शमीम पठाण
३. मा.अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
४. मा.डोके अपर्णा निलेश
५. मा.गावडे जयश्री वसंत
६. मा.साबळे छाया जगन्नाथ
७. मा.पहलानी गुरूबक्ष किशनदास
८. मा.जगताप विमलताई सुरेश
९. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.बारणे आप्पा उर्फ श्रीरंग चंदू
१३. मा.बारणे माया संतोष
१४. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१५. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१६. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१७. मा.कलाटे स्वाती मयुर

याशिवाय मा.सुभाष माछरे, ब क्षेत्रीय अधिकारी व मा.शांताराम राऊत, प्रशासन अधिकारी इ. सभेस उपस्थित होते.

प्रथम ब क्षेत्रीय अधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ५/०२/२०१४ रोजी विहित मुदतीत प्राप्त झालेले दोन सदस्यांचे एकुण तीन नामनिर्देशन पत्रे वाचून दाखविली व पिठासन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करणेबाबत विनंती केली. सदर तीनही नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सूचक व अनुमोदक खालीलप्रमाणे होते.

| नामनिर्देशन पत्र क्रमांक | उमेदवाराचे नांव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| ३ | मा.ओव्हाळ शेखर अशोक | मा.डोके अपर्णा निलेश | मा.शमीम पठाण |
| ४ | मा.ओव्हाळ शेखर अशोक | मा.डोके अपर्णा निलेश | मा.शमीम पठाण |
| १ | मा.जगताप विमलताई सुरेश | मा.बारणे निलेश हिरामण | मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा |

वरीलप्रमाणे ब प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली व तीनही नामनिर्देशनपत्र छाननीत वैध ठरविण्यात आली. त्यामध्ये मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.ओव्हाळ शेखर अशोक व मा.जगताप विमलताई सुरेश हे दोन रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १२.०५ ते १२.२० असा १५ मिनीटांचा कालावधी देण्यात आला. सदर कालावधीमध्ये मा.जगताप विमलाताई सुरेश या उमेदवाराने उमेदवारी माघारीचा विहित नमुन्यातील अर्ज पिठासन अधिकारी मा.गणेश पाटील, अप्पर जिल्हाधिकारी, पुणे. यांचेकडे सुपूर्द केला. त्यामुळे श्री. ओव्हाळ शेखर अशोक हे एकच वैधरित्या नामनिर्देशित सदस्य ब प्रभाग समिती सभापती पदाकरीता शिल्लक राहिले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०६/०२/२०१४ | विभाग | : प्रशासन |
| सुचक | : मा.डोके अपर्णा निलेश | अनुमोदक | : मा.पठाण शमीम |

ब प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणारे मा.ओव्हाळ शेखर अशोक हे एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.ओव्हाळ शेखर अशोक यांची ब प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

६/२/१४

( गणेश पाटील )
पिठासीन अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रिय कार्यालय, चिंचवड ३३.
क्र. बप्र/२/कावि/३०/२०१४
दिनांक : ०६/०२/२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती